बृहन्मुंबई पोलीस दलाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावयाचा परिच्छेद

विषय :— खाजगी सुरक्षा यंत्रणा अधिनियम २००५ अन्वये महाराष्ट्रातील खाजगी सुरक्षा यंत्रणांना परवाना देण्याबाबत.

संदर्भ :— शासन परिपत्रक क्रमांक—पीएसए—१२१८/प्र.क्र.३६८/विशा—४, दिनांक ११/१२/२०१९

उपरोक्त विषय व संदर्भानुसार कळविण्यात येते की, खाजगी सुरक्षा यंत्रणांना देण्यात येणाऱ्या परवाना प्रक्रियेमध्ये सुलभता आणण्यासाठी केंद्र शासनाने सदर परवाना ऑनलाईन पध्दतीने देण्यासाठी PSARA या सॉफ्टवेअरची निर्मिती केली आहे. व महाराष्ट्र राज्यातील परवाने देण्याचे अधिकार राज्य शासनास दिले आहेत. खाजगी सुरक्षा यंत्रणा अधिनियम २००५ या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी नियंत्रण प्राधिकारी म्हणून मा.प्रधान सचिव (विशेष) यांना प्राधिकृत केले आहे. तसेच दिनांक २८/११/२०१९ रोजी पासून PSARA Online Application Software चा वापर करण्यात येत असून, राज्य शासनामार्फत खाजगी सुरक्षा यंत्रणेचे परवाने देण्याची कार्यपध्दती कार्यान्वित झाली आहे.

महाराष्ट्र राज्यातील पसारा परवाने देणे ऑनलाईन झाले असल्याने, दिनांक २९/०१/२०२० पासुन अर्जदारांचे ऑफलाईन अर्ज स्विकारणे बंद करण्यात आले आहेत.

सदर बाब मुंबईतील खाजगी सुरक्षा यंत्रणा परवानाधारक तसेच नविन खाजगी सुरक्षा यंत्रणेचा परवाना प्राप्त करावयाचा असल्यास व त्याअनुषंगाने येणाऱ्या इतर बाबींकरीता अर्जदारांनी यापुढे शासनाच्या psara.gov.in या संकेत स्थळावर नोंदणी करुन त्यांचे अर्ज व संबंधीत कागदपत्रे सादर करावीत. सदर अर्जावर मा.प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून कार्यवाही करण्यात येईल.